# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/06/2023 (गुरूवार) दुपार

---

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :— दिनांक २१/०६/२०२३ चे १४.४५ वा. दरम्यान आरोपी नामे— सुरज मारूती बोंधाडे, वय २२ वर्ष रा. मकडधोकडा बोरी याचे फिर्यादी सोबत मागील चार वर्षापासुन प्रेम संबंध होते. परंतु आरोपी हा दारू पिण्याच्या सवईचा असल्याने मागील तीन महीन्यापासुन फिर्यादीचे आरोपीसोबत बोलचाल बंद होते. आरोपी हा मोटार सायकलीनी फिर्यादीच्या घरी जावुन "तु माझा सोबत का बोलत नाही" त्या कारणावरून वाद करून फिर्यादीला हातबुक्क्यांनी पाठीवर मानेवर मारपीट केली तिला शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४(डी), ४५२, ३२३, ५०४, ५०६ भादवि. सहकलम ११(४), १२ पोस्को कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक साखरकर पोस्टे बोरी मो. नं. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील नान्हा मौदा येथे दिनांक २०/०६/२०२३ चे २०.०० वा. पासुन ते दि. २१/०६/२०२३ चे ०६.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— योगेश अशोक भलोटीया, वय ४२ वर्षे रा. सतनामी नगर प्लॉट नं १९८ पोस्टे लकडगंज नागपूर यांचे नान्हा शिवारातील मॉ दुर्गा राईस मिल मधुन कोणीतरी अज्ञात चोराने आलमारीतुन ३ चांदीचे शिक्के किंमती अंदाजे ३५००/—रु., पुजेचे १००/— रू. चे नोटा नगदी १०,०००/—रु, सी. सी. टी. व्हि. कॅमेराचे सी. पी. प्लस कंपनीचे डी. व्ही. आर. किंमती अंदाजे ७०००/—रु, ५० किलोचे ६३ पोते प्रती ५००/—रु. पोते प्रमाणे ३१,५००/—रू. व जय श्रीराम तांदळाचे प्रती ३० किलोचे २० पोते प्रती पोते १०००/—रु. किंमती अंदाजे २०,०००/—रु. असा एकुण ७२,०००/—रुपयाचा मुद्देमाल चोरी करून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चौधरी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर